आत्मनिर्भर म्हणजे एखादी व्यक्ती एखादा देश आपल्या गरजा तसेच मागण्या पूर्ण करण्यासाठि कोणा इतर देशावर अवलंबुन न राहता त्यांच्याकडे कोणतीहि मागणी न करता स्वताच स्वतःच्या देशातील नागरिकांच्या मुलभुत गरजा पूर्ण करतो. यालाच आत्मनिर्भर होणे असे म्हणतात.

आपला भारत देश हा प्राचीन काळापासुनच आत्मनिर्भर आहे. कारण इथे सर्व वस्तु स्वतः तयार देखील केल्या जातात. आणि आपल्या देशाच्या हेतुसाठि त्याचा योग्य तो उपयोग देखील केला जातो. कारण ह्या अभियानाच्या मुख्य हेतुच तो आहे. भारतातील संसाधनांच्या मदतीने तयार केल्या गेलेल्या वस्तुंचा आपल्या भारतामध्येच वापर करणे उपयोग करणे तसेच भारतातील युवा पिढीला ह्या कामामध्येच रोजगार उपलब्ध करुन देणे, गरीबांना पर्याप्त अन्नसुविधा प्राप्त करून देणे गरीबांना पर्याप्त अन्न हा देखील मुख्य हेतु हे अभियान राबवण्यामागचा आहे. आणि कोरोना महामारीच्या काळात जेव्हा इतर देशातील वस्तुंची आयात बंद झाली होती. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकल कॉल व्होकल च्या नारा देणे सुरु केले होते. याचा अर्थ असा होता की आपल्या देशात बनलेल्या वस्तुंचाच वापर आणि तयार देखील भारतातील सर्व नागरिकांनी करावा असे जाहीर आवाहनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना केले होते

आत्मनिर्भर भारत हे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबवलेले हे अभियान आहे. आत्मनिर्भर भारत ही एक आर्थीक सहाय्य या योजना आहे जिचा प्रयोग भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबूत तसेच बळकट करण्यासाठि प्रत्येक नागरिक स्वयंनिर्भर होण्यासाठि योग्य योजना आखणे आणि त्यावर अंमलबजावणी करणे हा ह्या मागचा मुख्य हेतु होता.

भारताची अर्थव्यवस्था अधिक मजबुत होण्यासाठि भारतातील सर्व नागरिकांनी आत्मनिर्भर व्हायला हवे असा हा आत्मनिर्भर भारत योजनेचा मुळ हेतु आहे. कारण ऐन कोरोना महामारीच्या काळात खूप जणांना आर्थीक संकटांना तोंड द्यावे लागेले आहे म्हणुन आत्मनिर्भर भारत काळाची मुख्य गरज आता निर्माण झाली आहे याची जाणीव आपल्या सर्वांना देखील झाली आहे.

आत्मनिर्भर होना
अपनी पहचान
इसी से बढेगी देशी की
शान

ह्या संकल्पनेमागचा मुख्य अर्थ असा देखील आहे की आपला भारत देश संपन्न तसेच समृद्ध तेव्हाच होऊ शकतो जेव्हा आपण आत्मनिर्भर बनून त्यात आपले मोलाचे योगदान देऊ. कारण आज कोरोना महामारीच्या जाळ्यात इतर देशासोबतच आपला भारत देश देखील आज अशा अटीतटीच्या परिस्थीतीत अडकलेला आहे करता आपल्या क्षमतांचा कोणतीही पर्वा न वापर करुन आपल्या

देशातील एका वेगळ्या उंचीवर नेण्याचे काम आपण सर्व भारताचे नागरीक करू शकतो. यात कोणतीच शंका नाही.

"आत्मनिर्भर भारत बनाने का है सपना,
युवा शुरु करे कोई बिजनस अपना."

आत्मनिर्भर असणे निश्चितच एखाद्या देशाच्या विकासासाठी महत्वाची गोष्ट आहे. स्वावलंबी भारत योजनेत भारताला प्रत्येक क्षेत्रात सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामध्ये इतर देशांची मदत होते. आत्मनिर्भर भारत मोहिमेचे उद्दिष्ट म्हणजे भारतातील संसाधने वापरले. भारतातील अधिकाधिक उद्योगांचे प्रवाह वाढविणे आणि इथल्या प्रत्येक तरूणाला रोजगारक्षम व स्वावलंबी बनविणे हे काम आहे.

स्वयंपूर्ण भारतात त्या क्षेत्रात भारत दुसऱ्या देशास मदत घेतो त्या प्रत्येक क्षेत्राकडे लक्ष दिले जाईल. मग आपल्याला त्या क्षेत्रात सक्षम बनले पाहिजे. यामुळे देशाच्या विकासात मोठा फायदा होईल आणि भारत एक स्वावलंबी राष्ट्र होईल.

आपण आत्मनिर्भर होणे का गरजेचे आहे हे समजून घेण्यासाठी आपण कोरोना महामारीचेच उदाहरण घेऊ. जेव्हा आपल्या भारत देशात अचानकपणे कोरोना व्हायरसने प्रवेश करून थैमान घालणे सुरु केला तेव्हा ह्या कोरोना महामारीच्या काळात लॉकडाऊन लागल्यामुळे आपले सर्व उद्योग बंद पडले होते. देशाची सर्व अर्थव्यवस्था रुग्णांना बरे करण्यात लागली होती. आपल्याकडे त्यावर तोडगा म्हणून पाहिजे तेवढी औषधे उपलब्ध नसल्यामुळे आपल्याला जुन्या औषधांचे वापर रुग्णांना बरे करण्यासाठी करावा लागला होता. आणि ह्याच कोरोना महामारीला

अशाप्र पद्धतीने परिस्थितीला दोष न देता कोणावर विसंबुन न राहता आपल्या भारताच्या प्रत्येक नागरीक हा आत्मनिर्भर झाला पाहिजे आणि आत्मनिर्भर होण्याच्या प्रवासात त्याने नवीन तंत्रज्ञानाच देखील खिलाडी वृत्तीने स्वीकार केला पाहिजे आणि डिजीटल पद्धतीने व्यवहार करणे नोकरी तसेच व्यापार धंदे करणे शिकुन घ्यायला हवे जेणेकरुन भविष्यात पुन्हा कधी लॉकडाऊनची वेळ उद्भवली तर मागील काही महिन्यात तसेच एक-दोन वर्षामध्ये पैशांसाठी नोकरी व्यावसायासाठी आपली जी परवड झाली ती आजिबात पुढे होणार नाही.

"स्वदेशी अपनायो देश को बचाओ
स्वदेशी को अपनाना है
भारत को आत्मनिर्भर बनाना है"

# बुद्धिमंथन

प्रा डॉ व्ही पी शिरसे सर

"Brain Storming, is a discussion from which enable the group to do collective creative thinking"

कतीसंवादद्वारे व्यक्तीमधील नवनिर्माणिक विचाराला चालना देणारी प्रक्रिया म्हणजे बुद्धिमंथन. बुद्धिमंथन एक सर्जनशील गटकार्य आहे. बुद्धिमंथनात सहभागी होणाऱ्या सदस्यांना थोड्या वेळात जास्तीत जास्त नवनवीन कल्पना तयार कराव्या लागतात व त्यानंतर या कल्पनांचे विश्लेषण व मूल्यमापन होते.


★ बुद्धिमंथनाची उद्दिष्टे

1) वैचारिक सहभागीत्व वाढविणे.
2) नवीन कल्पना सादरीकरणास संधी देणे.
3) परस्पर विचारांचा आदर करण्याची क्षमता निर्माण करणे.
4) मुक्त वैचारिक वातावरण निर्मिती करणे.
5) विविध कल्पनांमध्ये सर्वानुमते फेरबदल करण्याची सवय लागणे.

★ बुद्धिमंथन तंत्राची कार्यवाही-

बुद्धीमंथन तंत्राच्या वापर करताना काही अवस्थांचा विचार करणे आवश्यक असते. विशिष्ट तंत्राचा मंत्र म्हणून वापर केल्यास त्याचा वापर यांत्रिकरूप ठरतो हे मात्र नक्की. म्हणूनच वर्ग रचना समस्येची व्याप्ती

विचारात घेऊन थोड्या फार प्रमाणात या तंत्राच्या वापरात लवचिकता असावी.



# प्रस्तावना

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी. अंतर्गत EPC-IV Reading and Reflating यामध्ये 'बुद्धीमंथन' या प्रात्याक्षिकाचा समावेश करण्यात आला.

वर्गामध्ये बुद्धीमंथन तंत्राचा वापर करीत असताना शिक्षकांना श्रोत्र प्रमुखाची भुमिका पार पाडावी लागते. त्याचबरोबर समस्या निश्चित करीत असताना विद्यार्थ्यांचा वयोगट, पूर्वानुभव, अनुभवविश्व, इ. घटक विचारात घेऊन समस्या निवडावी लागते. त्याप्रमाणे सर्व प्रशिक्षणार्थी समवेत राबविण्यात आले.

यामध्ये सर्व प्रशिक्षणार्थींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. बुद्धीमंथन प्रात्याक्षिक पुढीलप्रमाणे

बुद्धीमंथनाचा विषय - समाज माध्यमांचे व्यसन - जबाबदार कोण ?

Scanned with CamScanner

# उद्दिष्ट्ये

विद्यार्थ्यांना विचारप्रवर्तक बनविण्यास मदत करणे.

विविध कल्पनांमध्ये सर्वानुमते फेरबदल करण्याची सवय लागणे.

विविध प्रश्नांबाबत उपाय सुचविण्याची क्षमता निर्माण करणे.

कल्पनांचे विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करणे.

विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळवून देण्यास मदत करणे.

# पूर्वनियोजन

बुद्धीमंथन या प्रात्याक्षीक करण्यापूर्वी त्याविषयीची अधिक माहिती सांगण्यात आली. व प्रशिक्षणार्थीमध्ये एक उत्साह निर्माण झाला. या प्रात्याक्षिका संबंधी दिनांक - 27/04/2022 रोजी महाविद्यालयीन ग्रुपवर सुचना टाकण्यात आली. समाज माध्यमांचे व्यसन - जबाबदार कोण? हा विषय त्या सुचनाद्वारे सांगण्यात आला.

Scanned with CamScanner

## बुद्धीमंथनचा विषय -

समाज माध्यमांचे व्यसन-
जबाबदार कोण ?

☆ समाज माध्यमांचे व्यसन याला जबाबदार असणारे घटक खालीलप्रमाणे -

1. स्वतः
2. पालक
3. शासन व्यवस्था
4. समाज
5. वृत्तवाहिनी
6. कुटुंब
7. मित्र मैत्रिणी
8. संस्कृतीचा ऱ्हास
9. समाजमाध्यमे
10. बेरोजगार
11. तंत्रविज्ञान क्रांती
12. शिक्षण व्यवस्था
13. स्वभाव
14. ताणतणाव
15. प्रेमप्रकरण

Scanned with CamScanner

# प्रत्यक्ष कार्यवाही

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी अंतर्गत बी.एड भाग दोन, सत्र-चार अंतर्गत EPC-IV 'बुद्धिमंथन' या प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. या बुद्धीमंथनाच्या माध्यमातून विचारपूर्वक वनविन्यास मदत होते. यामध्ये प्रशिक्षणार्थींनी आपले विचार मांडले.

स्वतः शासन व्यवस्था, समाज, मित्रमैत्रिणी, वृत्तवाहिन्या, कुटुंब, पालक, तंत्रज्ञान क्रांती, शिक्षण-व्यवस्था, स्वभाव, संस्कृतीचा ऱ्हास, ताणतणाव, समाजमाध्यमे, प्रेमप्रकरण, बेरोजगारी, इ. विषय प्रशिक्षणार्थी मधून मांडण्यात आले. बुद्धीमंथनास सुरुवात करण्यापूर्वी त्यांची कृती व माहिती देण्यास आली. त्याप्रमाणे प्रत्येक प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले.

1) स्वतः -

माझ्या मते समाज माध्यमांच्या व्यसनास मी स्वतः जबाबदार आहे. कारण आपण किती वेळ मोबाईल हाताळायचा यास स्वतः जबाबदार आहोत कारण आपण नेटवर्कच्या माध्यमातून एखाद्या विषयीची माहिती शोधत असतो. तेव्हा त्या वेळेस सोशल मिडियाच्या माध्यमातून मेसेज आला तर तोच आपण पाहात राहतो. चॅटिंगच्या माध्यमातून आपण आपला मौल्यवान वेळ वाया घालवतो. हेच आपण कामापुरतच वापर केला तर वेळ वाया जाणार नाही. या विषयावर

Scanned with CamScanner

अमर गोडगे-पाटील, माधुरी जगताप, स्नेहल गुरव, योगीता गवळी, अंजली गायकवाड, प्रतिक्षा मुंढे या प्रशिक्षणार्थींनी त्यांची मत व्यक्त केली

2) शासन व्यवस्था -

हरी मुकटे, बाबासाहेब तोरणे सर यांनी शासन व्यवस्था समाज माध्यमांना जबाबदार आहे, याबद्दल मत व्यक्त केले. त्यामध्ये त्यांनी लोकांना मूलभुत प्रश्नापासून दूर ठेवून इतर गोष्टीकडे लक्ष वेधले जाते. तसेच युवकांना समाज माध्यमामध्ये अडकून त्यांना त्यांच्या गरजांपासून लांब ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

3) समाज -

शुभम जाधवर सरांनी समाज हा घटक समाज माध्यम व्यसनास जबाबदार आहे असे मत व्यक्त केले. त्यांच्या मते, समाजातील चालणाऱ्या घडामोडी किंवा मग गुन्हेगारी प्रवृत्ती ही समाजातून प्रसार झाल्यानेच वाढीस लागते. एखादी छोटी गोष्ट मोठी करून सोशल मिडियाच्या माध्यमातून फॉरवर्ड (forword) करणे. त्यामुळे मोबाईलचा अतिवापर होतो.

4) मित्रमैत्रिणी -

आशुबा वाघमारे सरांनी समाज माध्यम व्यसनास मित्र-मैत्रिणी जबाबदार आहेत. त्यांच्यामते मित्र-मैत्रिणीच्या अधिक सहवासाने मोबाईलवरील असणा सोशल मीडियाच्या वापर जास्त होतो. त्यांनी अनेक उदा. माध्यमातून मत व्यक्त केले. त्यामध्ये नागपूर मध्ये मित्र-मित्र फिरण्यासाठी गेल्यानंतर त्यांनी बोटी

प्रवास करत असताना सेल्फीच्या नादात आपला जीव गमावला. या प्रकारचे मत व्यक्त केले.

5) वृत्तवाहिनी-
अमर क्षीरसागर सरांनी या विषयीचे मत व्यक्त केले. त्यामध्ये अनेक बातम्यांच्या माध्यमातून काही चांगल्या सवयी लागतात. परंतु त्याच्या अतिवापराने व्यसन लागू शकते.

6) संस्कृतीचा ऱ्हास - प्रदिप सुतार यांनी संस्कृतीचा ऱ्हास या बद्दलचे मत व्यक्त केले. त्यात मोबाईलच्या अतिवापरामुळे येणाऱ्या पिढीला आपल्या रूढी परंपरा, संस्कृती विसरत चालली आहेत.

7) कुटुंब - गणेश जाधवर सर, अनुराधा साळुंखे मॅडम यांनी कुटुंब समाज माध्यमाच्या व्यसनास जबाबदार आहे. घरात एकत्र राहत असूनही मुलांकडे आमच्यासाठी वेळ नाही. त्यामुळे मुलांना आपण काम करत असल्यानंतर मोबाईल देतो. त्यांना एकप्रकारचे व्यसन लागते.

8) समाजमाध्यमे - प्रतिक्षा मुंढे मॅडम यांनी समाजमाध्यम व्यसन समाजमाध्यमच जबाबदार आहे असे मत व्यक्त

9) तंत्रविज्ञान क्रांती-
वैभव घुगे यांनी तंत्रविज्ञानातील क्रांती समाजमाध्यम व्यसनास जबाबदार आहे. त्यामध्ये त्यांनी या आधुनिकरणाच्या युगात तंत्रज्ञानाला अधिक महत्व आहे. त्यामुळेच त्याच्या अधिक वापराने एक प्रकारचे व्यसन लागू शकते. असे मत मांडले.

Scanned with CamScanner

# समारोप

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी बी.एड भाग दोन सत्र-चार अंतर्गत EPC-IV 'बुद्धीमंथन' या प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात आला याच्या माध्यमातून सर्व प्रशिक्षणार्थींना एक विचारप्रवर्तक बनविले गेले. प्रत्येकाला एक व्यासपीठ निर्माण करून देण्यात आले. याच्या माध्यमातून प्रत्येक जण बोलता झाला. प्रत्येकांनी आपले मत व्यक्त करून विचार प्रकट केले. त्यामुळेच समाज माध्यमांचे असणारे तोटे व फायदे या विषयीची माहिती मिळाली.

सदर प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी प्रा. डॉ. व्ही.पी. शिखरे सर यांनी मार्गदर्शन केले. धन्यवाद...!

Scanned with CamScanner

# आशुभाषण

प्रा. डॉ. आर. ए. फुरडे सर

- आशुभाषण म्हणजे अचानक दिला गेलेला विषय'
- भाषणाच्या वेळी अचानक विषय दिला जातो.

भाषणाच्या वेळी जो भाषण करणारा आहे किंवा बोलणारा आहे त्याला दोन-पाच मिनीटाचा कालावधी दिला जातो. आणि त्याच पाच मिनिटाच्या वेळेत दिला गेलेला विषय आपल्या विचारातून स्पष्ट करावा लागतो. जी व्यक्ती भाषणात अत्यंत पारंगत आहे. अशाच व्यक्ती आशुभाषणात सहभागी होतात. यासाठी आत्मविश्वास, धैर्य, विविध विषयांचे असणारे सखोल ज्ञान आवश्यक असते.

* आशुभाषणाचे फायदे -

1) आशुभाषणाच्या माध्यमातून विचारास चालना मिळते.

2) विदयार्थ्यांना वेळेची जाणीव होते.

3) समाजातील असणाऱ्या चालु घडामोडीचा आढावा येतो.

4) विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडून येतो.

5) दोन-पाच मिनिटात विचार मांडण्याचे महत्त्व कळते.

## ★ प्रस्तावना ★

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी. बी.एड भाग दोन, सत्र-चार 'आशुभाषण' या प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात आला.

आशुभाषणाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. या प्रात्यक्षिकाच्या आयोजन दिनांक २३/५/२२ रोजी करण्यात आले. त्यामध्ये प्रत्येकाला वेगवेगळे विषय देऊन व्यक्त होण्यास संधी दिली गेली. त्यामध्ये एकुण 34 जणांनी सहभाग घेतला. त्यामध्ये मैत्री, विभक्त कुटुंब, शिक्षण, सामंजस्य, भ्रष्टाचार असे अनेक विषय देण्यात आले. सदर कार्यवाही पुढीलप्रमाणे.

## ★ उद्दिष्ट्ये ★

1) विद्यार्थ्यांना 'आशुभाषण' या स्पर्धेची ओळख करून देण्यास मदत करणे.

2) विद्यार्थ्यांना विचारप्रवर्तक बनविण्यास मदत करणे.

3) विद्यार्थ्यांना व्यासपीठ निर्माण करून देणे.

4) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यास मदत करणे.

5) विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे.

6) विद्यार्थ्यांना अचानक वेळी विषय देऊन बोलता येण्यास प्रवृत्त करणे.

Scanned with CamScanner

# आशुभाषणाचे विषय -

1) मैत्री
2) विभक्त कुटुंब
3) शिक्षण
4) सामंजस्य
5) भ्रष्टाचार
6) बेकारी
7) अज्ञान
8) बाबा
9) सवय
10) सलोखा
11) सवड
12) निवड
13) आंदोलन
14) प्रेम प्रकरण
15) भावड
16) युद्ध
17) संस्कार
18) सिनेमा
19) इंटरनेट
20) सूड
21) निर्णय
22) आई
23) विवाह
24) बोभाय
25) पर्यटन
26) समाज
27) जिव्हाळा
28) मामाचे गाव
29) फॅशन
30) मनोरंजन
31) जीवन
32) मोबाईल
33) दूरदर्शन
34) ज्ञानाचा अभाव

Scanned with CamScanner

# प्रत्यक्ष कार्यवाही

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी बी.एड. भाग दोन, सत्र - चार EPC - IV मधील 'आशुभाषण' या प्रात्याक्षिकाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रत्येकाला 2 मिनीटाचा वेळ देण्यात आला.

हे प्रात्याक्षीक 23/04/2022 या रोजी आयोजन करण्यात आले. त्यामध्ये सर्वच प्रशिक्षणार्थीनी आपापले मत मांडले. दिलेल्या विषयावर प्रत्येक जणाने मनोगत व्यक्त केले. आशुभाषण म्हणजे अचानक एक विषय देऊन त्याविषयावर बोलण्यास सांगितले जाते. त्याप्रमाणे प्रथम या विषयासंदर्भात माहिती देण्यात आले. तसेच त्या विषयाच्या एक - एक चिठ्ठी करून ठेवण्यात आली. त्याचप्रमाणे प्रत्येक एका जणांना पुढे येऊन चिठ्ठी उचलून त्यामध्ये जो विषय असेल त्याविषयी 2 मिनिट बोलणे गरजेचे होते. अशाप्रकारे पद्धतीने एक-एक पुढे येऊन विषय मांडत होते. हे विषय मांडत असताना कोणी 1 मि, 1.08 मि, तर कोणी 2 मि अशा पद्धतीने मत व्यक्त केले.

या प्रात्याक्षिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मत व्यक्त करता आले. याच्या माध्यमातून विद्यार्थी विचारप्रवर्तक बनतात. त्यांचा आत्मविश्वास देखील वाढतो.

Scanned with CamScanner

# समारोप

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी बी.एड. भाग-दोन, सत्र-चार, यामध्ये EPC IV 'आशुभाषण' या प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात आला.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडून आला. तसेच मत व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ मिळाले. प्रत्येक विद्यार्थ्यास आपले विचार आपल्या शब्दात मांडता आले. 'आशुभाषण' स्पर्धेमध्ये किंवा या प्रात्यक्षिकामध्ये वेळेमध्येच आपला विषय कशा पद्धतीने मांडावा याचे कौशल्य प्राप्त होते.

सदर प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी प्रा. डॉ. आर. ए. फुरडे सरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

धन्यवाद...!

# पुस्तक परीक्षण

प्रा. डॉ. एम. एस. डिसले सर

★ प्रस्ताविक -

- दृष्टी स्वच्छ असली की सर्वकाही जसं आहे तसं काळा-पर्यंत आपणास दिसत असते - विल्यम ब्लॅक
- लक्षात ठेवा संपूर्ण विश्वाला पाहणारी सामावून घेणारे डोळे त्यांची क्षमता असते. परंतु हेच डोळे जर नकारात्मक झाली तर कितीही सुंदर गोष्ट कधीच पाहु शकत नाही
- ग्रंथ परीक्षण म्हणजे 'नवप्रकाशित पुस्तकांवरील ताजी प्रतिक्रिया होय.
- पुस्तक परीक्षणात पुस्तकात मांडलेला विषय त्याचे महत्त्व वेगळेपण लेखकाची भूमिका त्या ग्रंथातील वाङ्मयीन विशेष आणि ग्रंथ लेखनात लेखकाला लाभलेले यशापयश या मुद्द्यांच्या अनुषंगाने विशीष्ट मर्यादित विवेचन करणे अपेक्षित असते.

★ परीक्षण । समीक्षण -

- "परीक्षण" हे व्यक्तीनिष्ठ आवड-निवड नसुन वस्तुनिष्ठ व्यवहार आहे. मनुष्याला असलेल्या ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात मनाभिन्नता आहे. त्याच्या तौलानिक अभ्यास म्हणजेच 'परीक्षण' होय.
- कलाकृतीमधील गुणांची स्तुती करणे वा एखाद्या वस्तुचे यथार्थ अवलोकन करणे म्हणजे पुस्तक परीक्षण करणे होय.

Scanned with CamScanner

- विचार करण्याच्या शास्त्रीय पद्धतीला अनुसरून काही निश्चीत तत्वांच्या आधारे वाङ्मयाचे विवेक पूर्ण विश्लेषण करण्याची शक्ती असते तिला 'समीक्षा' परीक्षण म्हणतात.

★ पुस्तक परीक्षणाचे स्वरूप

1) समीक्षा 2) विवेचन 3) अवलोकन

★ परीक्षणाचे कार्य -

1) लेखक व वाचक यांना दिग्दर्शन
2) निरपेक्ष वृत्तीने दोष दिग्दर्शन
3) कलाकृतीतील सामर्थ्य संभावना यांचे स्वागत
4) वाचकाच्या वाङ्मयीन अभिरुचीची मशागत
5) परीक्षण आणि वाचक दिग्गज होते.
6) वाङ्मय व जीवन व्यवहार यांचा समन्वय साधणे.
7) साहित्य कलाकृतीचे वाङ्मयीन मूल्य निश्चीत करणे.
8) वाचकांच्या सामाजिक जीवनांचा विकास करणे.

★ ग्रंथ परीक्षणाची पूर्वतयारी

- ग्रंथाचे तपशीलवार बारकाईने वाचन केलेले असावे.
- ग्रंथातील उपयुक्त संदर्भांचा संकल्पना लक्षात घेऊन टिपणे घे
- वाचन टिपण काढून एक अभिप्राय तयार व्हावा.
- परीक्षणासाठी स्पष्टता अचूकतेची खात्री असावी.
- वस्तुनिष्ठता आणि तटस्थता सांभाळता येईल ही खात्री असावी.

Scanned with CamScanner

★ ग्रंथ परीक्षण / समीक्षा -

1) बाह्य परीक्षण / समीक्षा
2) अंतर्गत परीक्षण
3) इतर घटक

★ बाह्य परीक्षण / समीक्षा घटक

शीर्षक
↓
मुखपृष्ठ
↓
लेखक
↓
प्रकाशक
↓
उपलब्धतेचे ठिकाण
↓
प्रकाशन वर्ष
↓
पृष्ठसंख्या
↓
किंमत
↓
पुस्तकाचा आकार

★ अंतर्गत परीक्षण / समीक्षा घटक -

1) पुस्तकाचा हेतु
2) पुस्तकाचा आशय
3) विषय वस्तूंची मांडणी
4) क्रमबद्धता
5) सुसूत्रता
6) क्षेत्र
7) पुस्तकाचा दर्जा
8) भाषाशैली
9) वाङ्मयीन विशेष
10) गुणदोष दर्शन
11) अन्य विषयांचे सहसंबं
12) आशयाची विश्वसनीय
13) सदस स्थितीतील उपयु
14) लेखक लेखनाचे मो
15) न्यायीचितता.

# प्रस्तावना

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी बी.एड भाग दोन, सत्र चार अंतर्गत 'EPC-IV पुस्तक परीक्षण' या प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात आला त्यामध्ये आपण वाचलेल्या कोणत्याही एका पुस्तकाचे परीक्षण करून त्याचा अहवाल लिहणे.

वाचनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास घडून यावा. यासाठी या प्रात्यक्षिकाचे अंतर्भाव करण्यात आला. शालेय व महाविदयालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने पुस्तक परीक्षण प्रात्यक्षिक घेण्यात आले.

या परीक्षणाबरोबरच आकलनासह वाचन करणे गरजेचे आवश्यक आहे. सर्वकष वाचन सवय जोपासणे गरजेचे आहे. सदर प्रात्यक्षिक पुढीलप्रमाणे.

Scanned with CamScanner

# उद्दिष्टये

1) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यास मदत करणे.
2) आत्मविश्वास विचार विकास आणि व्यक्तिमत्व विकास करण्यास मदत करणे.
3) दैनंदिन जीवनात वाचनाची सवय निर्माण करणे.
4) वेगवेगळ्या कादंबरी, चरित्रे इ. वाचनाविषयी आवड निर्माण करणे.
5) विद्यार्थ्यांच्या ज्ञानप्राप्तीत वाढ करणे.

Scanned with CamScanner

# प्रत्यक्ष कार्यवाही

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी. B.ed - प्र Sem - IV 'पुस्तक परीक्षण' या प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात आला. यामध्ये 'तिमीरातुनी तेजाकडे' या पुस्तकाचे परीक्षण केले असुन ते खालीलप्रमाणे

## ★ बाह्य परीक्षण –

1) शीर्षक – "तिमिरातुनी तेजाकडे"

2) मुखपृष्ठ – मुखपृष्ठावर पुस्तकाचे शीर्षक आणि लेखकांचा उल्लेख केलेला आहे.

3) लेखक – डॉ. नरेंद्र दाभोलकर

4) प्रकाशक – राजहंस प्रकाशन प्रा. लि.
1025, सदाशीव पेठ, पुणे.

5) उपलब्धतेचे ठिकाण – महाविद्यालय (लायब्ररी)

6) प्रकाशन वर्ष – प्रथम आवृत्ती – एप्रिल 2010
आवृत्ती पाचवी – ऑक्टोबर 2013

7) पृष्ठ संख्या – 471

8) किंमत – 400 रुपये

Scanned with CamScanner

9) पुस्तकाचा आकार - लहान

# ★ अंतर्गत परीक्षण -

1) पुस्तकाचा हेतु -

विद्यार्थ्यांमध्ये पुस्तक वाचनातून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काय केले जाते आणि अंधश्रद्धा कशी घडवून आणली जाते हे या पुस्तकातून स्पष्ट केले आहे आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी त्यावर काय उपाय केले जातात. हे या पुस्तकात स्पष्ट केले आहे.

2) पुस्तकाचा आशय -

तमिशातुनी तेजाकडे या पुस्तकामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन याविषयीची माहिती स्पष्ट केली आहे. अंधश्रद्धा निर्मूलन करत असताना त्यापुढे काय याचाही विचार या पुस्तकात केला आहे तसेच अंधश्रद्धेची काही उदाहरणे ही या पुस्तकात देण्यात आलेले आहेत. ~~तसेच मुत~~

तसेच पुस्तकाचे तीन विभाग केले आहेत. पहिला विभाग अंधश्रद्धा निर्मूलनाशी संबंधित थेट बाबीच्याबद्दल आहे. दुसरा विभाग सर्व बाबीच्या संदर्भात अंनिसने जी कृतिशील झुंज दिली त्याबद्दल आहे. यामुळे वैचारिक मांडणीला प्रत्यक्ष कार्याचा भरभक्कम पाया मिळतो त्यानंतर तिसरा विभाग हा सैद्धांतिक आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या विषयाशी संबंधित जे विषय सतत चर्चिले जातात, त्यांची मांडणी त्यामध्ये केली आहे.

जादीची करणी', तसेच बुवाबाजीच्या संदर्भातील 'साहिब चमत्कार', 'कमरअली दैववेशाचा चमत्कार', लंगरच्या 'गोडबाबा', 'कुशियाचा दैवी उपचार' यांची माहिती या पुस्तकात दिलेली आहे. भूत दाखवण्याचे आव्हान दिलेल्या मांत्रिकाच्या फजितीची चित्रकथा यात आहे.

3) विषय वस्तुची मांडणी -

पुस्तकातील विषय वस्तुची मांडणी ही अत्यंत सोपी, साधी व सुरसुटीत केली आहे. यामध्ये पुस्तकाचे वाचन करत असताना घडून येणाऱ्या वेगवेगळ्या अंधश्रद्धांवर लोक कसा विश्वास ठेवतात व त्यातील काही लोक त्याचे कसे निर्मूलन करतात. हे दिसून आले.

4) क्रमबद्धता -

तिमिरातुनी तेजाकडे या पुस्तकाची क्रमबद्धता करताना याचे तीन विभाग पाडलेले आहेत. त्यामध्ये पहिला विभाग अंधश्रद्धा निर्मूलनाशी संबंधित आहे. दुसरा विभाग सर्व बाबींच्या संदर्भात अंनिसने जी कृतिशिल झुंज दिली त्याबद्दल आहे. तिसरा विभाग हा सैद्धांतिक आहे.

5) पुस्तकाचा दर्जा -

'तिमिरातुनी तेजाकडे' हे हे अत्यंत साध्या - सोप्या भाषेत लिहिलेले पुस्तक आहे. या पुस्तकाचा दर्जा अत्यंत उत्तम आहे. आणि हे पुस्तक सहज वाचले तरी लक्षात बसते.

Scanned with CamScanner

# समारोप

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय बार्शी. बी.एड भाग दोन, सत्र चार सन 2021-22 अंतर्गत EPC-IV (५) 'पुस्तक परीक्षण' या प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात आला. त्या पद्धतीने 'तिमिरातुनी तेजाकडे' या पुस्तकाचे परीक्षण करून अहवाल तयार करण्यात आला. या पुस्तक वाचनातून अंधश्रद्धेला कसा आळा घालयचा हे सांगितले आहे.

या पुस्तक वाचनातून प्रत्येकाच्या मनातील भीती, अंधश्रद्धा नक्कीच नाहीशी होईल तसेच विवेकी व्यक्ती घडवणे व विवेकी समाज-व्यवस्थेकडे वाटचाल करणे हेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ध्येय आहे. तसेच तिमिरातुनी तेजाकडे या पुस्तकातून व्यायाम, आहार, माहिती, ज्ञान, शास्त्रीय विचारपद्धती या घटकांचा विचार केलेला आहे. तसेच शास्त्रीय पद्धतीमध्ये निरीक्षण, तर्क, अनुमान, गणिती, प्रचिती, प्रयोग यांचा समावेश केला जातो.

अशा प्रकारे हे सदर प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी प्रा. डॉ. एम. एस. डिसले सरांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

धन्यवाद...

# गटचर्चा

प्रा. डॉ. पी. ए. पाटील सर

ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे फायदे आणि तोटे या विषयावर गटचर्चा करून अहवाल लेखन करणे.

## * प्रस्तावना *

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी. बी. एड. द्वितीय वर्ष, सत्र-चार मध्ये EPC प्रात्यक्षिकांतर्गत एका विषयावर गटचर्चा करून त्याचा अहवाल लिहणे. या प्रात्यक्षिकाचा समावेश करण्यात आला. एखादया विषयाचा सखोल अभ्यास करण्याचे कौशल्य याचा विकास होण्याकरित सदरील प्रात्यक्षिकाचा उपयोग होतो.

सदरील प्रात्यक्षिकामध्ये गटचर्चा करण्यासाठी ऑनलाईन शिक्षणाचे फायदे आणि तोटे या विषयाची निवड करून यावर गटचर्चा करण्यात आली. या प्रात्यक्षिकासाठी सर्व बी. एड. प्रशिक्षणार्थींनी उत्स्फुर्त प्रतिसाद सहभाग नोंदवला आहे.

सदर प्रात्यक्षिकासाठी / उपक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक / उपस्थिती म्हणून शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे बी. पी. एड. विभागाचे प्रा. डॉ. कांबळे सर उपस्थित होते. आणि उपक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. पी. ए. पाटील सर यांनी मार्गदर्शन केले.

सदर प्रात्यक्षिकाचा अहवाल पुढीलप्रमाणे. . . .

# उद्दिष्टये

1) गटचर्चेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना देणे. तसेच त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे.

2) विद्यार्थ्यांचे वक्तृत्व कौशल्य विकसित करण्यास मदत करणे.

3) गटचर्चेतून सहकार्य वृत्ती, सहानुभुती, विचारांची देवाणघेवाण, इ. मूल्यांचा, गुणांचा विकास करणे.

4) तसेच विद्यार्थ्यांमधील वेगवेगळे नेतृत्व गुण विकसित करणे.

5) संवाद कौशल्याचा विकास करण्यास मदत करणे

6) गटचर्चेच्या माध्यमातून स्वतःची मते मांडण्यास वाव मिळतो.

7) प्रशिक्षणार्थीमध्ये आभिरुची निर्माण होते.

# कार्यवाही

शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी बी.एड द्वितीय वर्ष, सत्र चार यामध्ये EPC या प्रात्याक्षिकांतर्गत सत्र चारसाठी Reading & Reflecting on text या प्रात्याक्षिकाचा समावेश करण्यात आला. यामध्ये एका विषयावर क गटचर्चा करून त्याचा अहवाल लिहण्यास ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे फायदे आणि तोटे या विषयाच्या समावेश करण्यात आला यासाठी वर्गात चार (4) गट तयार करण्यात आले ते खालीलप्रमाणे

गुप - ① zoom app Group -
ग्रुप - ② Google Meet
-॥- ③ Teach Meet
-॥- ④ cisco webex Group -

असे गट तयार करून त्यांना नावे देण्यात आली

1) zoom app Group - या गटामध्ये रोल नंबर 31-45 या प्रशिक्षणार्थींचा समावेश करण्यात आला. सदरील गटाने ऑनलाईन शिक्षणाची संकल्पना व त्याची माध्यमे कोणती ते सांगितले. ते पुढीलप्रमाणे

* ऑनलाईन शिक्षणाचा अर्थ -

1) ऑनलाईन शिक्षण म्हणजे वेगवेगळ्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण घरबसल्या वेगवेगळ्या शैक्षणिक सुविधांच्या माध्यमातून अगदी सुरुवातीपासून ते डिग्रीपर्यंतचे शिक्षण इंटरनेटद्वारे

Scanned with CamScanner

घेऊ शकतो म्हणजेच याला ऑनलाईन ~~म्ह~~ शिक्षण म्हणता येईल.

2) ऑनलाईन शिक्षण म्हणजे कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही वेळी, इलेक्ट्रॉनिक साधनांच्या व इंटरनेटच्या साहाय्याने घेतले जाणारे शिक्षण होय.

3) ऑनलाईन शिक्षण प्रणाली म्हणजे केवळ zoom, google meet च्या माध्यमातून video conforencing द्वारे online lecture होणे नाही. तर विविध electronic माध्यमे वापरून अध्ययन - अध्यापन करणे होय.

★ ऑनलाईन शिक्षण पद्धतीची माध्यमे –

1) Google Meet
2) zoom app
3) Whatsapp
4) Telegram
5) Youtube
6) Google clasroom
7) Microsoft Team
8) Power point presentation
9) BYJU'S App
10) Diksha App
11) Student App
12) SWAYAm
13) cisco webex Meeting
14) unacademy
15) proper Learning App
16) Coursera
17) skillshare
18) Edx. org
19) NCERT & UGC
20) GoTo meting
21) Skype
22) Lifesize
23) click meeting
24) slack
25) swadhyay

Scanned with CamScanner

## ★ ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे फायदे -

1) ऑनलाईन शिक्षणामुळे वेळेची पैशाची, श्रमाची बचत होते. तसेच शिक्षणामध्ये लवचिकता येते व आपल्या वेळेनुसार आपल्या सोयीनुसार शिक्षण घेऊ शकतो.

2) आपल्या अभ्यासक्रमामधुन काही गोष्टी समजल्या नाहीत तर अशा परिस्थीतीत, गुगलवर आम्ही सोप्या भाषेत माहिती शोधून त्या गोष्टी पाहु शकतो.

3) ऑनलाईन शिक्षणाचा सर्वात मोठा फायदा हा आहे की, विद्यार्थी देशातील किंवा परदेशातील कोणत्याही संस्थेचे शिक्षण घेऊ शकतात.

4) ऑनलाईन शिक्षणात स्थळाचे / ठिकाणाचे बंधन नसते शैक्षणिक संकुलात न जाता शिक्षण घेता येते.

5) शहरात मिळणारे दर्जेदार शिक्षण गावातील मुलांना देखील मिळत आहे.

6) एखादया आपत्तीच्या वेळी जेव्हा शाळेत, महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेणे शक्य नसते तेव्हा ऑनलाईन पद्धतीद्वारे विद्यार्थी घरबसल्या शिक्षण घेऊ शकतात.

7) ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा होणारा प्रवासावरील खर्च प्रवासासाठी लागणारा वेळ व शक्ती यांची बचत होते.

8) ऑनलाईन शिक्षण मिळवल्याने संसाधनाचा खर्च वाचतो.

Scanned with CamScanner

9) ऑनलाईन शिक्षण केवळ विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित न राहता सर्वांसाठी उपलब्ध असणारा ज्ञानाचा स्त्रोत आहे

10) ऑनलाईन अभ्यासक्रम तुम्हाला स्वयंशिस्तबद्ध व्हायला शिकवतात.

11) दप्तराचे ओझे वहावे लागत नाही.

12) ऑनलाईन शिक्षणामुळे शिकवलेला अभ्यास पुन्हा-पुन्हा पाहु शकतो.

13) ऑनलाईन शिक्षणामुळे पालकांना शिक्षकांचे अध्यापन कसे आहे व त्यांचे विचार कळतात.

14) ऑनलाईन शिक्षणामुळे तंत्रज्ञानाच्या वापर कसा करावा याची माहिती होते.

15) विविध क्षेत्रातील सर्व भाषांमधुन ज्ञान प्राप्त होते.

16) शालेय, महाविद्यालयीन शिक्षणासोबत विविध कौशल्य अभ्यासक्रम पूर्ण करू शकतो.

17) जगाच्या पाठीवर कोठेही शिक्षण घेता येते.

18) online quiz द्वारे विद्यार्थ्यांचे मूल्यमापन वेळोवेळी करता येते.

Scanned with CamScanner

## * ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे तोटे –

1) ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे काही मुले शिक्षणापासून वंचित राहु शकतात. कारण मोबाईल, इंटरनेट, नेटवर्क या सुविधा प्रत्येक विद्यार्थ्याला उपलब्ध असतीलच असे नाही.

2) विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणास गांभीर्याने घेत नाहीत.

3) मोबाईल किंवा संगणकासमोर जास्त वेळ बसल्याने विद्यार्थ्यांना डोळ्यांना आणि कानाला त्रास होतो.

4) ऑनलाईन शिक्षणात विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग घेता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देता येत नाहीत.

5) तांत्रिक, व्यावहारिक ज्ञानाच्या आणि शिस्तीचा अभाव दिसून येतो.

6) ऑनलाईन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना मोबाईलचे व्यसन लागण्याची शक्यता असते.

7) ऑनलाईन शिक्षणामुळे लेखन कौशल्य व संभाषण कौशल्य कमी होते.

8) आरोग्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम होताना दिसून येतो उदा. दृष्टीदोष, कर्णदोष, इ.

9) संशोधन कार्यासाठी मर्यादा पडतात.

Scanned with CamScanner

# समारोप

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी. बी. एड द्वितीय वर्ष, सत्र चार, यामध्ये EPC चा भाग म्हणून Reading & Reflecting on text या प्रात्याक्षिकामध्ये "गटचर्चा" याचे आयोजन करण्यात आले होते. या गटचर्चेचा विषय म्हणून ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे फायदे आणि तोटे या विषयाची निवड करण्यात आली होती.

प्रशिक्षणार्थींमध्ये गट तयार करून गटांतून प्रत्येकाने आपल्या स्वतःच्या विचारातून ऑनलाईन शिक्षण पद्धतीचे फायदे आणि तोटे सांगितले. यातून एकमेकांना सुसंवाद साधण्यात आला. तसेच विचारांची देवाण - घेवाण झाली आणि या चर्चेतून वेगवेगळे अनुभव व मत ऐकण्यास मिळाले. या समळ्या चर्चेतून फायदे आणि तोटे याचा सारांश काढण्यात आला आणि यामध्ये सरांनी देखील आपले मत मांडले.

अशा प्रकारे हे प्रात्याक्षिक पूर्ण करण्यासाठी प्रा. डॉ. पी. ए. पाटील सर यांचे मोलाचे मार्गदर्शन प्रशिक्षणार्थींना लाभले.

धन्यवाद . . .

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय , बार्शी.

## जि. सोलापूर

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

श्री / श्रीमती अल्पना महादेव पिंपळे

याने / हिने सदर विषयाचे प्रात्यक्षिक कार्य समाधानकारकरित्या दिनांक 1/05/2022

ते दि. 13/05/22 कालावधीत स्वतः पूर्ण केले आहे.

मार्गदर्शक प्राध्यापकांची सही

Scanned with CamScanner